दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ● मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार दि.२३ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -६६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## नीलेश राणेंचा भाजपला रामराम

# जय महाराष्ट्र म्हणत घेणार शिवसेनेचा धनुष्यबाण हाती, कुडाळ विधानसभा निवडणूक लढवणार




**मुंबई (वृत्तसंस्था)**
भाजप नेते नीलेश राणे यांनी आज भाजपला रामराम केला. उद्या ते शिवसेनेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कुडाळमध्ये प्रवेश करणार आहेत. माझा शिवसेनतील प्रवेश निश्चित झाला आहे. हा सर्व विषय नेत्यांनी ठरवलेला आहे, असे पत्रकार परिषद घेत नीलेश राणे यांनी म्हटले आहे.नीलेश राणे म्हणाले की, नारायण राणे यांच्या राजकारणाची सुरवात झालेल्या पक्षात मला काम करण्याची संधी मिळत आहे. केवळ कुडाळमधून निवडणूक जिंकण्यासाठी आपण काम करणाार आहोत. कुडाळमधून धनुष्यबाणवर निवडणूक लढवणार असे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे आता जवळपास २० वर्षांनी राणे कुटुंबातील व्यक्ती पुन्हा धनुष्यबाण या चिन्हावर निवडणूक लढवणार आहे. २००४ साली नारायण राणे धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढले होते.
नीलेश राणे म्हणाले की, भाजपमध्ये मला शिस्त शिकायला मिळाली. देवेंद्र फडणवीस यांनी मला कायम लहान भावासारखी वागणूक दिली. भाजपमध्ये सर्वच नेत्यांसोबत माझे चांगले संबंध आहेत, ते कायम राहतील. आज जास्त काही बोलण्यासारखे नाही. पण एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात काम करण्याची जी संधी मिळाली त्याचा आनंद आहे. पक्षांने काही हवा काढली नाही. मी शिस्त आणि प्रोटोकॉल पाळणारा माणूस आहे.नीलेश राणे हे २००९ च्या लोकसभा निवडणुकीत रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघातून खासदार झाले होते. २०१४ आणि २०१९ या दोन लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत नीलेश राणे हे कुडाळ-मालवणमधून लढण्यास इच्छुक आहेत.कुडाळ आणि मालवण या दोन तालुक्यांचा मिळून २००८ नंतर कुडाळ विधानसभा मतदारसंघ तयार झाला आहे. त्याआधी मालवण विधानसभा मतदारसंघ होता. १९९० पासून २०१४ पर्यंत सतत नारायण राणेच या मतदारसंघातून विजयी झाले. पण २०१४ ला चित्र पालटले. काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीधर नाईक यांचे पुतणे वैभव नाईक जायंट किलर ठरले. त्यांनी नारायण राणे यांचा १० हजारपेक्षा जास्त मतांनी पराभव केला. तर २०१९ मध्येही नारायण राणेंनी रणजित देसाई यांना बळ दिले पण त्याचा फायदा झाला नाही.

## धनंजय मुंडे २४ ऑक्टोंबर रोजी दाखल करणार उमेदवारी अर्ज पंकजा मुंडे याही राहणार उपस्थित



**परळी । प्रतिनिधी**
धनंजय मुंडे दिनांक २४ ऑक्टोंबर गुरुवार रोजी २३३ परळी विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत .यावेळी भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस तसेच विधान परिषदेच्या सदस्या आ.पंकजाताई मुंडे याही उपस्थित राहणार आहेत .
दिनांक २२ ऑक्टोबर पासून परळी विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करणे सुरू झाले आहे. विद्यमान आमदार व राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे हे गुरुवार दिनांक २४ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ ते ३ यादरम्यान आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करताना साध्या पद्धतीने तसेच कोणतीही सभा न घेता आपला अर्ज दाखल करणार आहेत.
यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्या व भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या आमदार पंकजाताई मुंडे तसेच महायुतीचे घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## केज राखीव विधानसभेच्या मतदार संघात २१ इच्छुकांनी ४९ नामनिर्देशन पत्र घेतले

### मात्र अद्याप पर्यंत एकही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र सादर केले नाही

**गौतम बचुटे । केज**
अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या केज विधानसभा मतदार संघात उमेदवारी अर्ज दाखल पहिल्या दिवशी २१ इच्छुकांनी ४९ नामनिर्देशन पत्र खरेदी केले आहेत. त्या मध्ये समाजवादी पार्टी-१, भारतीय जनता पार्टी ४,भारतीय युवा जन एकता पार्टी-४, बहूजन महा पार्टी-४, नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)-४, टिपू सुलतान पार्टी-२, शेतकरी कामगार पक्ष-१, वंचीत बहुजन आघाडी-१, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-२, अपक्ष-२५ यांनी नामनिर्देशन पत्र खरेदी केले असून अद्याप पर्यंत एकही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र सादर केले नाही.
अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दीपक वजाळे यांनी दिली. निवडणूक निर्णय अधिकारी दीपक वजाळे यांना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे, केजचे तहसीलदार राकेश गिड्डे, गट विकास अधिकारी प्रियांका टोंगे आणि समृद्धी दिवाणे या मदत करीत आहेत.




### निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात तगडा बंदोबस्त

**निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय तथा केज तहसील कार्यालयात सीमा सुरक्षा दलाच्या सशस्त्र जवानांना तगडा बंदोबस्त असून त्यांच्या सोबत पोलीस यंत्रणा देखील सतर्क असल्याची माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना आणि पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी दिली आहे.**

## त्या चिमुकलीला लातूर येथे हलविले तिच्या उपचारासाठी मदतीची गरज





**गौतम बचुटे । केज**
एचपीएम कंपनी आणि महामार्ग प्राधिकरणाच्या गलथानपणामुळे टोल नाक्यावर झालेल्या अपघातात एका दोन महिन्याच्या चिमुकली सह तिची आई आजी, बहीण, चुलता आणि ड्रायव्हर जखमी झाले होते. त्या चिमुकलीचा उजवा हात खांद्या पासून तुटून पडला होता. तो तुटलेला हात अपघात स्थळा वरून अपघातग्रस्त वाहन बाजूला हटविताना तब्बल अठरा तासा पेक्षा जास्त वेळे नंतर सापडला होता. त्या हात गमावलेल्या चिमुकली वर प्लॅस्टिक सर्जरी करण्यासाठी तिला लातूर येथील सरकारी रुग्णालयात हलविले. मात्र त्या चिमुकली किंवा तिच्या कुटुंबाची भेट घेण्यासाठी ना कोणी महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी गेले ना एचपीएम कंपनीचे अधिकारी गेले !
दि. १८ ऑक्टोबर रोजी रात्री गुरुनाथ दत्तात्रय जाधव वय (२८ वर्ष), त्यांची भावजई प्रणिता नवनाथ जाधव वय (२४ वर्ष), पुतणी शावडी नवनाथ जाधव, द (रा. केदार वडगाव ता. मुखेड जि. नांदेड) (ह. मु. रांजणगाव (शेणपुंजी) ता. गंगापूर जि. संभाजी नगर, त्यांच्या भावजईची आई कलावतीबाई भगवान जुने वय (५२ वर्ष), सर्व रा. चालक गजानन उत्तमराव वेदपाठक वय ३५ वर्ष हे ह्युंदाई व्हेन्यु क्र. (एम एच २०/जी क्यू -२९४९) ने दोन महिन्याचे बाळ व बाळंतीण यांना घेवून संभाजीनगरकडे जात होते. रात्री १०:३० वा. च्या सुमारास केज-मांजरसुंबा रोडवर केज जवळ असलेल्या उमरी फाट्या जवळ असलेल्या टोल नाक्यावर टाकलेल्या मातीच्या ढिगारा आणि जुना सिमेंट रस्ता उखडून टाकलेल्या अवशेषांचा ढिगारा याला धडकून कारने दोन ते तीन पलट्या खाल्ल्या. यात या कारचे प्रचंड नुकसान होवून कारचे तुकडे झाले. या भीषण अपघातात दोन महिन्याच्या चिमुकलीचा उजवा हात खांद्या पासून तुटून पडला होता. तो तुटलेला हात अपघात स्थळा वरून अपघातग्रस्त वाहन बाजूला हटविताना तब्बल अठरा तासा पेक्षा जास्त वेळे नंतर सापडला होता.
सुदैवाने तिचा जीव वाचविण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील बालरोग विभागातील डॉक्टरांचे अथक प्रयत्न सुरू आहेत.
आज दि. २२ रोजी त्या चिमुकलीला लातूर येथील स्व. विलासराव देशमुख सर्वोपचार रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयात हातावर सर्जरी करण्यासाठी हलविले आहे.

### अपघातातील चिमुकली साठी प्रयत्न करणारे

**अपघात जखमी झालेल्या चिमुकलीचा जीव वाचवा म्हणून आरोग्य मंत्र्यांचे स्विय सहाय्यक डॉ जे एन सय्यद, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अशोक.थोरात, बालरोग विभागातील डॉ. दिलीप भोईनवाड आणि त्यांचा स्टाफ यांनी परिश्रम घेतले आहेत.**

### पत्रकार बांधव आणि वकिलांची मदत

**अपघात झाल्या नंतर जेष्ठ पत्रकार अ. र. पटेल यांचे मित्र विधीज्ञ ड. इस्माईल गवळी यांच्यासह त्यांचे सहकारी मित्र यांनीही हे त्या कुटुंबाला मदत करण्यासाठी सरसावले आहेत.**

### जाधव कुटुंब हे अत्यंत गरीब

**अपघातातील चिमुकलीचे आई वडील व चुलते हे मूळचे नांदेड जिल्ह्यातील असून ते उपजिविकेसाठी संभाजी नगर येथील शेन पुंजी रांजण गाव येथे वडापाव आणि अंडा आम्लेटचा गाडा चालवतात**

### अपघात ग्रस्तांना मदतीची गरज

**अपघातातील जखमी जाधव कुटुंब आणि जुने कुटुंब हे अत्यंत गरीब असून त्यांची हलाखीची परिस्थिती आहे. त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता**

### आमदार संग्राम भैय्या जगताप यांना निवडून आणण्यासाठी

## शहरातील शेकडो मेहतर समाजातील नागरिकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नालेगाव, भिंगार, वसंत टेकडी, सिद्धार्थनगर, सावेडी, पाईपलाईन रोडसह विविध भागांमधील वाल्मिकी मेहतर समाजातील शेकडो महिला व नागरिकांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षात मध्ये प्रवेश केला. माजी आमदार अरुण जगताप यांनी पक्षाचे उपरणे घालून सर्वांचे पक्षात स्वागत केले. यावेळी विश्वास जुनासंग्राम भैय्या पुन्हा अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी आ,अरुण जगताप म्हणाले, नगर शहर बदलण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या माध्यमातून आ.संग्राम जगताप यांनी शहराला वेगाने विकासाच्या वाटेवर नेले आहे. या विकासाच्या मुद्यावरच आ.संग्राम जगताप हे तिसऱ्यांदा विधानसभा लढवत आहेत. शहरातील सर्व स्तरातील जनतेचे प्रश्न सोडवण्यास आ.जगतापांनी प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सर्व जनतेच्या आशीर्वादाच्या व विश्वासाच्या बळावरच ते पुन्हा निवडणूक लढवत आहे. मेहतर समाजातील शेकडो नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून आ.जगतापांचे हात बळकट केले आहेत. यावेळी मुन्नाबाई चावरे यांनी मनोगत व्यक्त करतना सांगितले की, अहिल्यानगर शहरात आ.संग्राम जगताप यांनी जी विकास कामे केली आहेत एवढे विकास कामे याधी कोणीही कधीच केली नाहीयेत. त्यामुळे त्यांनी केलेल्या विकास कामांनी आम्ही प्रभावित झालो आहोत. आ.जगतापांनी मेहतर समाजाच्याचेही अनेक प्रश्न सोडवले आहेत. त्यामुळेच त्यांना मेहतर समाज पाठिंबा देत आहोत.यावेळी उपस्थित नागरिकांनी आ.संग्राम जगताप यांनी मेहतर समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लावल्या बद्दल आभार मानले. तसेच भिंगार शहरात वाल्मिकी प्रवेशद्वार मंजूर केल्याबद्दलही आ.जगताप यांचे आभार मानले. यावेळी यावेळी मेहतर समाजाचे अनिल तेजी, बिल्लू घावरी, पै.लक्ष्मण सारसर, पै.अनिल वाणे शक्ती सोहत्रे, राजेश सोहत्रे, संदीप करोलीया, तुषार करोलीया, गौरव चावरे, रवी मोरकरोसे, किशोर माने, अनुप चव्हाण, जगदीश कुडिया, मुन्नाबाई चावरे आदींच्या नेतृत्वाखाली शेकडो मेहतर समाजातील कार्यकर्त्यांनी व महिलांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या कार्यक्रमास छावणी परिषदेचे माजी उपाध्यक्ष संभाजी भिंगारदिवे, प्रवीण घावरी, प्रमोद आठवल, विशाल झुंज, शुभम टाक, रवी गोहेर, राजेश तेजी, रोहित बागडी, सनी खरारे, सचिन बागडी, मनोज बागडी, करण वाणे, हर्षल सारसर, श्रीराज चव्हाण, संदीप लखन, टिंकू चव्हाण, सुमित गोहेल, रितेश निधाने, आशिष तेजी, आकाश करोलीया, बाबासाहेब सारसर आदी उपस्थित होते.
मयूर बांगर यांनी प्रास्ताविक केले तर विशाल बेलपावर यांनी आभार मानले.

# सुरेश धस यांच्या विजयासाठी पुण्यातील आष्टीकर एकवटले



**पाटोदा (प्रतिनिधी)**–आष्टी तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न घेऊन आपण राजकारणात आलो सरपंच मनापासून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे लक्ष देऊन दर्जेदार शिक्षण घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे तात्कालीन पहिली ते सातवीतील असलेले विद्यार्थी आज पुणे जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रात स्थिरावले आहेत याचा आपणास अभिमान वाटत असून त्यांच्यासाठी काही करता आले याची समाधान वाटत आहे असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले. आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील मूळ रहिवासी असलेल्या पुणे जिल्ह्यातील नागरिकांच्या वाकड, हडपसर आणि रांजणगाव येथे आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

पुढे बोलताना धस म्हणाले की,पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात आपल्याकडील लोक कार्यरत आहेत आयटी क्षेत्रात असतील व्यावसायिक क्षेत्रात असतील ड्रायव्हर क्षेत्रात देखील आपल्या भागातील मुले बहुसंख्येने आहेत जे की स्वतःची वाहने घेऊन या क्षेत्रात आलेली आहेत १९९९ पासून आज पर्यंत गोरगरिबांची शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत असलेल्या घेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाद्वारे दर्जेदार मिळावे यासाठी शैक्षणिक कार्यावर भर देत आलेलो आहे ज्यावेळेस मी पहिल्यांदा जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष झालो त्यावेळेस शिक्षकांचा तुटवडा आणि असलेल्या रिक्त जागा मला जाणवत होत्या त्यात तात्काळ भरण्यासाठी मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असल्याने तत्कालीन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी मला या निर्णयासाठी सर्वाधिकार दिले आणि त्यावेळेस एक हजार शिक्षकांची मेगा भरती करण्याचे काम पहिल्यांदा मी केलं २००१ ते २००५ पर्यंत ही रमणी पॅटर्न लागू केला ३० टक्के गुणवत्ता असलेल्या शाळा त्या २००५ साली ६८.६०% पर्यंत गेल्या आणि याच कालावधीमध्ये असलेले पहिले ते सातवी वर्गातील मुलं आज आपल्याला पुणे जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम करताना दिसत आहेत माझ्या मतदारसंघातील जरेवाडी ची ३० विद्यार्थी पटसंख्या असलेली शाळा आज १३०० विद्यार्थ्यांची झालेली आहे आज त्या शाळेत विद्यार्थ्याला प्रवेश घ्यायचा असेल तर त्याला वेटिंग आहे शिवाय कोतन येथील शाळा देखील त्याच धर्तीवर मार्गक्रमण करत आहे त्या ठिकाणचे मिसाळ नावाचे शिक्षक तर जरेवाडी चे संदीप पवार हे शिक्षक गुणवत्ता वाढीचे प्रामाणिकपणे काम करत आहेत अशा शिक्षकांची आज प्रामुख्याने गरज आहे माझ्या कार्यकाळात जिल्हा परिषद शाळेच्या खुल्या असतील अंगणवाडी खुले असतील त्याला भरघोस निधी उपलब्ध करून देण्याचे काम मी प्रामाणिक केले मात्र २०१४ ते २०१९ आणि २०१९ ते २०२४ या दहा वर्षाच्या कार्यकाळात दोन लोकप्रतिनिधी यांच्या कार्यकाळात ७८४ शाळा खोल्या या कमी असून ४५० ते ५०० अंगणवाड्या खोल्या देखील उपलब्ध करून शकले नाहीत हे विदारक चित्र आज मतदारसंघाचे आहे. यावेळी नगरसेवक शांताराम भालेकर, हिंजवडीचे सरपंच दत्ता साखरे, माझी सभापती सुरेश हुळवले, मल्हारी साखरे, कासार साई चे सरपंच ललित शिंदे नगरसेवक गोपाळ माळेकर,नगरसेवक बाबा त्रिभुवन माजी सभापती प्रमिलाताई सगळे, उद्योजक बंडूशेठ तोडकर उद्योजक शहादेव चौधरी, सतीश कंठाळे, बापू तांबे,कुमार कोकणे, गणेश कदम, दीपक गुंड, राजू वलवळे, अनिल टेकाळे, सोमीनाथ मंडलिक, बापू तांबे,स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे ऊसतोड मुकादम संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप, हडपसर नगरसेविका उज्वला जंगले,सुभाष जंगले,सोमनाथ जराड या कार्यक्रमाचे नियोजन उद्योजक अनिल टेकाळे, राजेंद्रजी वलवळे,विनोद शिंदे,दीपक गुंड,कुमार कोकने,शकर जरांगे,कृष्णा बांगर,राजू चखाले,चिंचोली सरपंच मारुती सांगळे, गणपत जगताप,हिरामण बुचुडे,युवा नेते जय साखरे,विकास एकशिंगे,गणेश कदम,सर्जेराव कचरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## पनवेल व उरण विधानसभा क्षेत्रात तरुणाईची लाट मनसेत घुसली



**उरण । विठ्ठल ममताबादे**

मनसे जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात मनसेच्या जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, उपजिल्हाध्यक्ष दिपक कांबळी, तालुका अध्यक्ष सत्यवान भगत, मनसे पर्यावरण सेनेचे जिल्हाध्यक्ष अभिजीत घरत, महिला तालुकाध्यक्ष कविता म्हात्रे,विद्यार्थी जिल्हा उपाध्यक्ष गणेश तांडेल यांच्या प्रमुख उपस्थितीत चाणजे ग्रामपंचायत, उलवे नोड, मोहपाडा येथील असंख्य तरुणांनी मनसेत प्रवेश केला हे प्रवेश मनसेच्या वाहतूक सेनेचे विधानसभा चिटणीस सतीश पाटील, तसेच मनसेचे उप तालुका अध्यक्ष भालचंद्र म्हात्रे यांच्या माध्यमातून झाला. तसेच पनवेल तालुक्यात खांदा कॉलनी येथील मनसे कार्यालयात कामोठे तसेच शहरातील विविध भागातील तरुणांनी मनसे प्रवक्ते तथा महानगर अध्यक्ष योगेश चिले व जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मनसेत पक्षप्रवेश केला.दिवसेंदिवस मनसे कडे तरुणांचा ओढा वाढला असून मनसेचा करिष्मा तरुण वर्गात मोठया प्रमाणात दिसून येत आहे.

## ठाकरे गटात आर्थिक देवाण घेवाण करत तिकीट वाटप

### निष्ठावानांना डावलून बाहेरुन आलेल्यांना संधी–संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**– ठाकरे गटात आर्थिक देवाण–घेवाण करुन उमेदवारी दिली. निष्ठावानांना डावलून बाहेरुन आलेल्यांना उमेदवारी दिल्याचा आरोप शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केला आहे. तुमच्याकडे आले तर ते निष्ठावान आणि दुसऱ्या पक्षात गेले तर गद्दार असताात का असा सवालही शिरसाट यांनी उपस्थित केला आहे.

संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, शिवबंधन बांधले, एबी फॉर्म दिला आणि निवडणुकीला लागा हे सर्व प्रकार पैशा शिवाय होत नाही. यात निश्चितच पैशाची देवाण–घेवाण झाली आहे.

उबाठाला असे वाटत होते की आमच्यामुळे इतर पक्ष चालत आहेत, त्यांना काँग्रेसने चांगली चपराक दिली आहे. माईक खेचाताणीपर्यंत त्यांचा प्रकार गेला आहे. शिवसेना प्रमुखांनी तयार केलेल्या नेत्यांची अशी अवस्था काल महाराष्ट्राने अनुभवली म्हणत शिंदेंचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी ठाकरे गटावर निशाणा साधला आहे. संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, काँग्रेस–राष्ट्रवादीसोबत युती करू नका आम्ही सांगायचो, त्यांच्याबरोबर युती केल्यावर काय परिणाम होतात. तुमच्या पत्रकार परिषदेत तुम्हाला कसे सुनावले जाते. तुटेपर्यंत ताणू नका हे सांगितले जाते ही नामुष्मीची वेळ त्यांच्यावर आली आहे.संजय शिरसाट म्हणाले की, महायुतीत मुख्यमंत्रीपदाच्या नावाची चर्चा नाही. अब्दुल सत्तार यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत केलेले वक्तव्य हे त्यांचे वक्तव्य आहे. मी पक्षाचा प्रवक्ता म्हणून सांगतो की महायुतीमध्ये मुख्चयमंत्रीपदाबाबत काही ठरलेले नाही. ही निवडणूक एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात लढली जाणार हे फिक्स झाले आहे. मुख्यमंत्रीपदाबाबत निवडणुकरनंतर ठरणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तर प्रत्येकाला आपला नेता हा मुख्यमंत्री व्हावा असे वाटते, मलाही एकनाथ शिंदेंनी पुन्हा मुख्यमंत्री व्हावे असे वाटते पण त्यावर आमची काहीच चर्चा झाली नाही. निवडणुकरानंतर मुख्यमंत्रीपदा बाबत ठरेल असे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

## पैठण तालुक्यात परतीच्या पावसाचा मोठा दणका

### आडुळ परिसरात पावसामुळे कापसाच्या झाल्या वाती

**पैठण । चैताली औटे**

तालुक्यातील आडुळ परिसरातील मागील पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीनंतर पुन्हा रविवारी रात्री धो धो पाऊस बरसला यामुळे खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले असून रब्बी हंगामातील उगवणाऱ्या कोवळ्या शाळू ज्वारीलाही मोठा फटका बसला आहे. दरम्यान अतिवृष्टीच्या या नैसर्गिक संकटांमध्ये बळीराजा भांबावून गेला असून नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी शेतकरी करत आहे.

मागील आठवड्यात परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनच्या पिकांचे नुकसान झाले असून अडुळ परिसरात वेळोवेळी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे कापसाच्या वाती झाल्या आहेत.पिकाला मोठा फटका बसला होता.यानंतर आता पुन्हा आलेल्या जोरदार पावसामुळे वेचणीला आलेल्या कपाशीच्या वाती झाल्या आहेत. परिसरातील अनेक ठिकाणी कपाशीवर झाल्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे त्यामुळे एका वेचणीतच कपाशीचा खराटा होत आहे.खरीप हंगामावर मोठा खर्च



करूनही पाहिजे तसे उत्पादन मिळत नसल्याने आता पेरणीचा खर्चही निघतो की नाही याची चिंता बळीराजाला लागली आहे.

ऐन दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांवर हे नैसर्गिक संकट ओढवल्याने शेतकऱ्यांची दिवाळी काळोखात जाणार असल्याची चिन्हे दिसून आली आहे.शेतातील कापूस भिजल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे.यासोबतच रब्बी हंगामातील नव्याने उगवून आलेल्या शाळु ज्वारीचे कोवळे पीक पाण्यात डुबल्याने त्याचेही मोठे नुकसान झाले आहे.त्यामुळे शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

## घनसावंगी विधानसभा मतदार संघात ३५ उमेदवारांसाठी ९६ फॉर्मची विक्री

### पहिल्या दिवशी एका उमेदवाराचे दोन फॉर्म दाखल

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवारांचे २२ ऑक्टोबर पासून उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येत आहे. मंगळवारी उमेदवारी अर्ज स्विकारण्याच्या पहिल्या दिवशी ३५ उमेदवारांसाठी ९६ फॉर्मची विक्री झाली असून एका उमेदवाराने दोन उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती मनिषा दांडगे यांनी दिली.

घनसावंगी विधानसभा मतदार संघात नेमके किती उमेदवार निवडणूक लढविणार हे सध्या सांगता येणार नसले तरी सध्या तरी अनेक इच्छुक उमेदवार निवडणूक रिंगणात उतरणार असल्याची चर्चा आहे. मात्र शेवटपर्यंत किती उमेदवार निवडणूक रिंगणात राहणार हे ४ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी स्पष्ट होणार आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात राजकिय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत.



घनसावंगी विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख २४ हजार ७८३ मतदार असून, त्यात पुरूष १ लाख ६८ हजार ६९७, महिला १ लाख ५५ हजार ९५२ तर सैनिक मतदार १३४ आहेत. यासाठी एकूण ३५४ मतदान केंद्र आहेत. ३५४ व राखीव ३६ असे एकूण ३८९ पथके स्थापन केली असून, यात अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आली आहे, अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार योगिता खटावकर यांनी दिली.

## हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या बदनापूर तालुका अध्यक्ष पदी मिर्झा इलियास बेग

**जालना । असलम कुरेशी**

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अध्यक्षतेखाली बदनापूर येथे संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल व बदनापूरचे पत्रकार उपस्थित होते.

या बैठकित संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या बदनापूर तालुका अध्यक्ष पदी मिर्झा इलियास बेग यांची नियुक्ती केली.



याप्रसंगी राज्यात कुठेही पत्रकारांवर अन्याय झाल्यास हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशन पत्रकारांच्या समस्यांवर आवाज उठवणार असल्याचे प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी सांगितले.

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या बदनापूर तालुका अध्यक्ष पदी मिर्झा इलियास बेग यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, महाराष्ट्र प्रदेश महासचिव विनोद भोकरे, महाराष्ट्र प्रदेश सचिव जावेद पठाण (भोकरदन), महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रणजितसिंह ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रियाज शेख, महाराष्ट्र प्रदेश सहसचिव शेख शकिल (जळगांव), सय्यद ज़ाकिर हुसैन, मराठवाडा प्रवक्ता रहिम पठाण, विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद, महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी अमजद पठाण, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य फहिम शेख, शुजाअत कुरेशी, राम कोडवते, उमेश गोधने, महेश भैराम, धनंजय तरारे, विदर्भ विभागीय अध्यक्ष मो. तारेक शेख, नागपूर जिल्हा अध्यक्ष देवेंद्र मुरकुटे, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष मिर्झा अक्रम बेग, अमरावती जिल्हा अध्यक्ष मुबिन शेख, वाशिम जिल्हा अध्यक्ष फय्याज कुरेशी, गोंदीया जिल्हा अध्यक्ष गौरव कुमार, वर्धा जिल्हा अध्यक्ष तन्वीर खान, नांदेड जिल्हा अध्यक्ष सुनिल शेळके आदिंनी त्यांचे अभिनंदन केले.

## शिवा आरोग्य अभियान अंतर्गत ठाकरवाडी तील नागरिकांची आरोग्य तपासणी संपन्न

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

खुलताबाद तालुक्यातील ठाकरवाडी येथे शिव आरोग्य अभियान अंतर्गत विशेष आरोग्य मोहीम राबवण्यात आली . या दरम्यान निरगुडी, भिलवाडी, ठाकरवाडी या गावातील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

मंगळवार दि.२२ ऑक्टोंबर रोजी हे शिव आरोग्य विशेष तपासणी मोहीम ठाकरवाडी सभागृहात सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत करण्यात आली, या आरोग्य तपासणी अंतर्गत पंचक्रोशीतील लाभार्थ्यांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची आरोग्य तपासणी करून घेतली. तपासणी मध्ये नागरिकांची जनरल चेकअप, नेत्र तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, मधुमेह तपासणी, त्वचा तपासणी आदी विविध तपासण्या करण्यात आल्या, तसेच मोफत मोतीबिंदूचे ऑपरेशन, व मोफत औषध वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे



आयोजक डॉ. सुशिल भास्कर दुधारे, वेरूळ पी.एच.सी चे मेडिकल ऑफिसर डॉ. राजुळे सर, डॉ.ऋषिकेश वाघमारे, फार्मासिस्ट अनिल समिंदर, करण पाटील कन्नर, कौशल दुधारे, प्रतिक दुधारे,जालम सिंग गांगड, ज्ञानेश्वर भाऊ दुधारे, राठोड, मंधे , इत्यादी ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# परळीसह महाराष्ट्रात एमआयएम इन्कलाब पक्ष ४३ जागा लढविणार- राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.ख़वी अबबासी

**परळी । प्रतिनिधी**

परळी मतदारसंघातील पहिल्या उमेद्वारची अधिकृत घोषणा:
एमआयएम इन्कलाब पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष शेख मुस्तफांना उमेदवारी जाहीर.
परळी वैजनाथ (प्रतिनिधी):-
ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत (ए.आय.एम.आय.एम) पक्षाची परळी शहरात पदाधिकारी मेळावा व आढाव बैठकीत परळीसह महाराष्ट्रात ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत ए.आय.एम.आय.एम.पक्ष ४३ जागा लढविणार असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.ख़वी अबबासी यांनी सांगितले. तसेच ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत (ए.आय.एम.आय.एम) पक्षाच्या संपर्क कार्यालयाचे शुभारंभ राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.ख़वी अबबासी यांच्या हस्ते करण्यात आला असल्याची माहिती एमआयएम इन्कलाब पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष मुस्तफा शेख यांनी दिली आहे.

ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत (ए.आय.एम.आय.एम) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. ख़वी अबबासी साहेब हे महाराष्ट्रतील विधानसभा निवडणुक अनुषंगाने बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ दौऱ्यावर रविवार दि.२० ऑक्टोबर रोजी आले होते. विधानसभा निवडणुकीचा आढावा बैठक घेऊन विविध विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच विधानसभा निवडणुकीच्या महाराष्ट्रातील इच्छूक उमेदवारांच्या




मुलाखती घेण्यात आली. लवकरच उमेद्वारची अधिकृत घोषणा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सागीतले. महाराष्ट्रात एमआयएम इन्कलाब पक्ष ४३ जागा लढविणार असल्याचे त्यांनी सागीतले. ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत पक्षाचा राज्यव्यापी कार्यकर्त्या मेळावात विविध विषयावर मार्गदर्शन केले. तसेच राज्यातील अनेक प्रश्नावर पत्रकार परिषद घेऊन आवाज उठविणार असल्याचे त्यांनी सागीतले. या मेळाव्यास हैदराबाद येथील पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.ख़वी अबबासी साहेब यांच्यासह अब्दुल माजीद अत्तार साहेब, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नासेर, समीउल्ला आझाद, खाजा मैनोद्दीन, अझीमोदिन खान, मोहमद हाजी आली, हबीब रिजवान आशमी, इमत्याजोद्दीन, नांदेड जिल्हाध्यक्ष खमर भाई, परभणी जिल्हाध्यक्ष शेख सलीम भाई, औरंगाबादचे जिल्हाध्यक्ष समदभाई बागवान, व पक्षाचे सर्व पदाधिकारी व जिल्हाध्यक्ष हे उपस्थित होते. तसेच परळी मतदारसंघातील पहिल्या उमेद्वारची अधिकृत घोषणा करण्यात आली. यामध्ये परळीतील एमआयएमचे उमेदवार म्हणून शेख मुस्तफांना संधी देण्यात आली आहे. या उमेदवारीचे सर्वत्र स्वागत होत आहे. या सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन शेख मुस्तफा यांनी मानले.

# बीडची जागा शिवसेनेचीच, मुख्यमंत्री शिंदे साहेब बाळासाहेबांच्या एकनिष्ठ शिवसैनिकावर अन्याय करणार नाहीत- सुनिल अनभुले

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. एकदा नव्हे तब्बल तीन वेळा शिवसेनेचा आमदार बीडकरांनी निवडणुन दिला आहे. वर्षानुवर्षे बीड मतदार संघाची जागा शिवसेनेला सुटत आली आहे आणि ती यावेळेसही शिवसेनेलाच सुटणार आहे. तीन दशकांपेक्षा अधिक काळ मा. अनिलदादा जगताप हे बाळासाहेबांच्या विचारधारनेला प्रेरित होऊन संपूर्ण जिल्ह्याभरात शिवसेना पक्ष बांधणी करत आले आहेत. बीडला शिवसेनेचा बालेकिल्ला बनविण्यात अनिलदादांचे योगदान मोलाचे आहे



आणि हे बीडकर देखील चांगलेच जाणून आहेत. आजवर शिवसेना आणि बाळासाहेब यांच्या विचार व धोरनावर ठाम राहणाऱ्या अनिलदादा जगताप यांच्या कार्याचे आणि योगदानाची सर्वोपरी माहिती तळागाळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांना आहे. यामुळे मुख्यमंत्री शिंदे साहेब हे बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक असणाऱ्या मा. अनिलदादा जगताप यांच्यावर अन्याय होऊ न देता अनिलदादांना न्याय देणार असा आम्हा शिवसैनिकांना पूर्णतः विश्वास असल्याचे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी माध्यमांना पत्रक प्रसिद्ध करून आपले मत व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे व त्यासाठी कामाला लागा असे सांगितले देखील आहे आणि आम्ही देखील सर्व शिवसैनिक अनिलदादा जगताप यांना विक्रमी मतांनी निवडून आणण्यासाठी कामाला लागलो आहोत. अनिलदादा जगताप यांचा यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विजय पक्का आहे व ते विक्रमी मतांनी निवडून येणार यात तिळमात्र शंका नाही असे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी पत्रकात म्हंटले

# पत्रकार सुनिल (सुज्ञान)ज्ञानदेव भोसले यांना आदर्श पत्रकार पुरष्कार प्रदान

**पुणे । प्रतिनिधी**

पत्रकार सुनिल भोसले यांचं काम गेले दहा वर्षपासून निस्वार्थीपणे करत असतात पत्रकार व संपादक आणि पत्रकार संघटना आध्यक्ष पदावर महाराष्ट्र मध्ये करत असतात आपण समाजामध्ये आपल्या कार्यकुशलतेने वेगळ्या क्षेत्रात नावलौकिक मिळवून समाज सेवा करीत आहात आपले सत्कर्म सभोतीच्या समाजाला एक माणुकीच्या मार्गांवर टाकायला मदत करतात अशा पेरल्या हातांच्या सत्यवृतमध्ये तुमचा समावेश आहे हे जाहीरपणे नमूद करायला आभिमान वाटतो आपल्या कार्याचा नंददीप सदैव तेवत राहो कुठलाही गाजवावाजवा न करता पुण्यशील पवित्र व पावन कार्य धडाडीचे करत आला आहात आपल्या विधायक निशुद्ध निसंकोच कार्याचा गौरव व्हावा म्हणून आम्ही



आपल्याला कार्यकर्तृवावर प्रकाश झोतात टाकला आहे निशुद्ध नजरेने वंचिताच्या उत्थनाच्या उद्धीष्ठाकडे पाहणाऱ्या आपल्या व्यक्तिमतवास कार्यास अनुसरून लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य आधीवाशी प्रदेश आध्यक्ष आदर्श पत्रकार सुनिल (सुज्ञान) ज्ञानदेव भोसले पुणे यांना पुरस्काररुपी सन्मानपत्र बहाल करत आहोत असे डॉ. प्राध्यापक संघर्ष सावळे बोलत होते बुद्ध जयंती उत्सव २०२४ साहित्यधारा बहुउधेशीय संवस्था तर्फे सन्मान करुण्यात आले शिवसाई होटेल मध्ये मुंढवा पुणे येथे कार्यक्रम झाला उपस्थित प्रमुख पाहुणे आयोजक संवस्थापक आाध्यक्ष डॉ. प्राध्यापक संघर्ष सावळे व हुमन राईट्स महाराष्ट्र राज्य आध्यक्ष प्रल्हाद तांदळे शितल शेगोकर मंगलाताई गर्दे गोदावरीताई पावन जाधव ,पत्रकार सुनिल ज्ञानदेव भोसले याना पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा

# परळी मतदारसंघातील १२२ संवेदनशील मतदान केंद्राबाबत दोन दिवसांत स्पष्टीकरण द्या

## राजेभाऊ फड यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

**परळी । प्रतिनिधी**

२३३ परळी विधानसभा मतदारसंघात १२२ मतदान केंद्र हे अतिसंवेदनशील स्वरूपाचे आहेत. मागील लोकसभा निवडणुकीतून हे दिसून आलेले आहे. त्या मतदान केंद्रांवर गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येऊन सुद्धा त्यावर प्रशासनाने कुठलीही उपाययोजना केलेली नाही. येत्या विधानसभा निवडणुकीत या सर्व मतदान केंद्रावर बोगस मतदान होण्याची आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या सर्व संवेदनशील असलेल्या मतदान केंद्रावर सीसीटिव्ही यंत्रणा आणि सुरक्षा यंत्रणा पुरवली जावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली आहे. यावर निर्वाळा देत असताना न्या.एस.जी.चपळगावकर व न्या.विभा कंकणवाडी यांच्या न्यायालयाने म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने याबाबत येत्या दोन दिवसांत त्यांचे स्पष्टीकरण आणि शपथपत्र सादर करावे व त्यावर काय उपाययोजना केल्या याबाबत कोर्टाला अवगत करावे असे आदेश दिले आहेत.परळी विधानसभा निवडणूक ही लोकशाही पद्धतीने आणि निर्भय वातावरणात पार पडावी, तसेच अनुचित प्रकार



घडू नयेत अथवा बोगस मतदान होऊ नये यासाठी निवडणूक आयोगाने योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. मात्र याबाबत प्रशासनाकडून कुठलीही उपाययोजना होतांना दिसत नाही. याच कारणास्तव राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ११८७७ दाखल केली आहे. यावर न्यायालयाने निवडणूक आयोगाला येत्या दोन दिवसांत स्पष्टीकरण आणि शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि राजकीय दबावाखाली काम करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेला चपराक बसली आहे. मतदारसंघातील १२२ बूथ बद्दल योग्य ती उपाययोजना करून लोकशाही पद्धतीने आणि निर्भय वातावरणात निवडणूक घ्या असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

## परळी विधानसभेत होऊ शकतो मुंडे विरुद्ध मुंडे सामना

# वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून परळी विधानसभेसाठी विष्णू मुंडे इच्छुक

## प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्याकडे केली विष्णू मुंडे यांनी परळी विधानसभेच्या उमेदवारीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीने आत्तापर्यंत महाराष्ट्रातील वंचित बहुजन आघाडी कडून निवडणूक लढवणाऱ्या अधिकृत उमेदवारांच्या पाच याद्या जाहीर केली आहे. प्रचारासाठी वेळ कमी असल्यामुळे आता पुढील यादी लवकरच जाहीर होईल. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड. प्रकाश आंबेडकर, प्रदेश अध्यक्ष रेखाताई ठाकूर, जिल्हा प्रभारी प्रा.किसन चव्हाण यांच्याकडे परळी विधानसभाची विष्णू मुंडे यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. परळी विधानसभा मतदारसंघात अजित पवार यांच्या गटाकडून माजी मंत्री धनंजय मुंडे हे विधानसभेचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहेत. त्यामध्ये वंचित बहुजन आघाडी कडून जर विष्णू मुंडे निवडणुकीच्या मैदानात आले तर मुंडे विरुद्ध मुंडे असा सामना पाहायला मिळेल.
वंचित बहुजन आघाडी पक्ष जो निर्णय घेईल तो माला मान्य आहे,असे त्यांनी सांगितले ज्यावेळी पक्षाने जो आदेश दिला आहे तो ऐकला आहे व त्या पद्धतीने आज पर्यंत काम केले आहे.
बीड जिल्ह्यातील बीड, केज,परळी येथील उमेदवार जाहिर होणे बाकी आहे. परळी विधानसभा मतदार मतदान संघातून वंचित बहुजन आघाडीचे माजी परळी तालुका महासचिव विष्णू मुंडे यांनी पक्षाची इच्छुक उमेदवारी अर्ज करून मागणी केली आहे. ते गेल्या आनेक वर्षां पासून ते काम करत आहे. परळी विधानसभा मतदान संघातून वंचित बहुजन आघाडीचे परळी तालुक्यातील टोकवाडी येथील माजी तालुका महासचिव विष्णू मुंडे यांनी देखील, मुंबई येथील प्रदेश कार्यालयात जाऊन पक्ष श्रेष्ठशी चर्चा देखील केली आहे. परळी विधानसभेसाठी साठी कोणाची वर्णी लागते याकडे सर्व जिल्ह्याचे व राजकीय पक्षाचे लक्ष आहे.वंचित बहुजन आघाडीमुळे,स्थापन झाल्यापासून राज्याच्या राजकारणात अनेक मोठे उलट फेर व बदल केले आहेत. वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार कोण ? हा सध्या बीड जिल्ह्यात चर्चेचा विषय आहे.




# धम्म हा मानवतेला जोडणारा महा मार्ग आहे -के.आर.पडळ गुरूजी

## विभागीय सचिव,भारतीय बौद्ध महासभा

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा शाखा तालुका बीड च्या वतीने नाथसृष्टी,अंकुशनगर बीड येथे दिनांक २०/१०/२०२४ रोजी वर्षावास समारोह व दिक्षा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभा, छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय सचिव पडळ गुरूजी, प्रमुख पाहुने म्हणून जयभीम सेना मुंबईचे अध्यक्ष नितीन मोरे, बीड जिल्हा पश्चिमचे अध्यक्ष महालिंग निकाळजे,माजी विभागीय सचिव आदरणीय निर्सगंध, जि.बीड चे सरचिटणीस सिद्धार्थ जगझाप, जिल्हा पर्यटन उपाध्यक्ष एड. हणुमंत कांबळे, जिल्हा संस्कार अध्यक्ष प्रा. खेमाडे ,तालुकाध्यक्ष राजेंद्र




ससाणे, शिरसाठ , गोपीनाथ बनसोडे ,उत्तमराव पवार,उद्योजक अशोकराव गायकवाड, आणि आषाढ ते अश्विन या काळात बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे अविरतपणे वाचन केलेल्या सुजातातााई खेमाडे,निताताई मस्के,बबितााई सिरसट, सरवदेताई,शुभांगी सुतार,किसनाबाई रामराव सुतार तसेच अनेक समता सैनिक ईत्यांदींच्या उपस्थितीत वर्षावास व दिक्षा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी विभागीय सचिव पडळ गुरूजी यांनी बौद्ध धम्म हा समतेच्या आचरणाचा प्रगतीशील मार्ग आहे. मानवी मनाचा विकास हा धम्माचा केंद्रबिंदू आहे. धम्म हा मानवतेला जोडणारा महामार्ग आहे असे संबोधित करताना विश्वरत्न, बौद्धीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या जीववरील एक अर्थपूर्ण गीत गाऊन मार्गदर्शन केले. धम्माचा मार्ग स्विकारल्याने निश्चितपणे मानवी मनाचा विकास होईल असा विश्वास बाळगून या उत्साहाच्या प्रसंगी एडव्होकेट हणुमंत कांबळे, उत्तमराव पवार, एड. मगर,किसनाबाई सुतार,सुनिल पाटोळे, वाघमारे शिवाजी, सुमित्रा वाघमारे या कुटूंबबियांनी स्वयंमस्फुर्तपणे पडळ गुरूजी यांचेकडून धम्म दाक्षा घेतली आहे. या कार्यक्रमाचे शिस्तबद्ध सूत्रसंचालन आयु. प्रा.खेमाडे यांनी केले. आणि उत्तम आयोजन तालुकाध्यक्ष राजेंद्र ससाणे यांनी केले. आभार आणि खिर दानानंतराने कार्यक्रम समारोप करण्यात आला.

# माझ्यावर पुन्हा दाखलेला विश्वास सार्थ ठरवण्याचाच प्रयत्न असेल

**नागपूर (वृत्तसंस्था)**-भाजपने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. भाजपच्या पहिल्या यादीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांत पाटील, आशिष शेलार या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. यामध्ये अनेक बहुतांश विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा संधी दिली गेली आहे. तर काही नवीन चेहऱ्यांचीही वर्णी लागली आहे. पक्षनेतृत्त्वाने माझ्यावर पुन्हा दाखवलेला विश्वास सार्थ ठरविण्याचाच माझा प्रयत्न असेल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. फडणवीस यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.
देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतीय जनता पार्टीने मला विधानसभा निवडणुकीसाठी सहाव्यांदा संधी दिली. भारतीय जनता पार्टीने पुन्हा एकदा माझ्यावर विश्वास दाखविल्याबद्दल मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शाह आणि मा. भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डाजी तसेच केंद्रीय निवडणूक समितीतील सर्व सन्माननीय नेत्यांचा मी नितांत आभारी आहे.पक्षनेतृत्त्व, माझ्या दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातील नागरिक आणि माझ्या



महाराष्ट्रातील मायबाप जनतेने सातत्याने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्याचाच माझा प्रयत्न असेल.भाजपाच्या पहिल्या यादीत माझ्याव्यतिरिक्त आणखी ९८ उमेदवार जाहीर झाले आहेत, त्यात आपले प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचाही समावेश आहे. त्यांच्यासह या उमेदवार यादीतील सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि त्यांना खूप खूप शुभेच्छा!

# दावेदार कितीही असले तरी तिकीट एकालाच मिळणार

## विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारीवर गिरीश महाजन यांची प्रतिक्रिया

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणूक आता अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. अशात भाजपने रविवारी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यात जवळपास ९९ जागांवर उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. तसेच उमेदवारी न मिळाल्याने अनेकांनी नाराजी देखील व्यक्त केली आहे. यावर भाजप नेते गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.माध्यमांशी बोलताना गिरीश महाजन म्हणाले, आगामी निवडणुकीसाठी काही ठिकाणी प्रमुख दावेदार आहेत. प्रत्येकाला वाटते की आपल्याला तिकीट मिळावे. गेल्या अनेक वर्षांपासून काम करत आहेत, तोलामोलाचे कार्यकर्ते आहेत, नेते आहेत. त्यामुळे स्वाभाविक आहे त्यांनी इच्छा व्यक्त करणे, मात्र तिकीट एकालाच मिळणार आहे. अशा अनेक ठिकाणी एका पेक्षा अधिक दावेदार आहेत, अनेक ठिकाणी भाजपला जागा पाहिजे, तिथे भाजपची चांगली शक्ती आमची त्या ठिकाणी आहे, कार्यकर्त्यांचे मोठे संघटन चांगले आहे. अशा ठिकाणी कार्यकर्त्यांना वाटते की ही जागा भाजपला सोडावी. या मागणीसाठी कार्यकर्ते देवेंद्र फडणवीस व चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटत आहेत, अशी माहिती भाजप नेते गिरीश महाजन यांनी दिली आहे.भाजप पक्षातील नेते राहुल आहेर हे एकमेव उमेदवार आहेत ज्यांनी उमेदवारीस नकार दिला आहे, मात्र त्यांचे नाव पहिल्या यादीत जाहीर करण्यात आले आहे. यावर गिरीश महाजन म्हणाले, राहुल आहेर गरवारे क्लब येथे जेव्हा देवेंद्र फडणवीस होते तेव्हाच त्यांना म्हणाले होते की मला उमेदवारी नको, माझ्या ऐवजी माझे चुलत भाऊ केदा आहेर यांना तिकीट देण्यात यावे, अशी मागणी राहुल आहेर यांनी माझ्या समोरच केली होती. देवेंद्र फडणवीस यांनी देखील हे मान्य केले होते. मात्र वरूनच राहुल आहेर यांचे नाव पुढे आले आहे.भाजप नेत्या देवयानी फरांदे यांचे काल भाजपने जाहीर केलेल्या यादीत नाव नव्हते यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. यावर गिरीश महाजन म्हणाले, पहिल्या यादीत नाव नाही म्हणजे येणारच नाही असे नाही. अजून अंतिम यादी यायची बाकी आहे. पक्षश्रेष्ठी सगळ्या बाबी तपासून घेत आहेत आणि त्यानंतर ते तिकीट देतील. पण पहिल्या यादीत नाव आले नाही म्हणून आपले नाव येणारच नाही असे कोणी समजू नये, असे मला वाटते, असे मत गिरीश महाजन यांनी व्यक्त केले आहे.विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचा फॉर्म्युला काय आहे, असा प्रश्न विचारला असता तेव्हा गिरीश महाजन म्हणाले, आमच्या ज्या जागा आहेत, जिथे आमचे विद्यमान आमदार आहेत, याच जागांवर आम्ही दावा सांगितला आहे. अशा कुठल्या जागा ज्या जाहीर करण्यात आल्या आहेत त्यावर मित्रपक्षातून वादग्रस्त तरी काही बोलण्यात आले नाहीये. त्यामुळे आमच्यात जागेवरून वाद नसल्याचे गिरीश महाजन म्हणाले. कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात शिवसेना पक्षातील अनेक पदाधिकारी व नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, काही ठिकाणी वाद आहेत, मात्र महायुती म्हणून आम्ही ताकदीने निवडणूक लढवणार आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## जिवाचीवाडी मध्ये विद्यमान अमदाराविषयी सर्वसामान्य जनतेचेची नाराजी–शिवाजी चौरे

**केज । सचिन भालेराव**



केज तालुक्यातील जिवाचीवाडी हे गाव पंकजाताई मुंडे यांचे प्राबल्य असलेले गाव अर्थातच भाजपच्या मागे खंबीरपणे उभे राहिलेले गाव परंतु या होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत मात्र वेगळे चित्र पाहायला मिळत आहे जरी वंजारी मतदान असले तरी यावेळी मोठ्या प्रमाणात मत विभागणी होईल असे येथील ग्रामपंचायत सदस्य यांनी मत मांडले आहे.

याविषयी सविस्तर वृत्त असे की यावेळी मताचा विभागणीचे कारण म्हणजे विद्यमान आमदाराचे शेतकरी वर्गाच्या योजनेकडे असलेले दुर्लक्ष तसेच विधानसभेच्या पार्श्वभूमीवर जीवाची वाडी तालुका केज येथील गाव गाड्यातील सामान्य माणूस स्व. कै. गोपीनाथ मुंडे साहेबापासून ते आज पंकजा मुंडे धनंजय मुंडे साहेब असतील यांच्या बाजूने असलेले गाव पण स्थानिक प्रतिनिधींना वैतागली आहेत. जीवाचीवाडी मध्ये जलजीवन सारखा विषय खूप मोठा त्यामध्ये भ्रष्टाचार होत असून पण आमदार यावर एकदा पण बोलू शकले नाही असे अनेक प्रश्न बाकीचे विषय असतील शेतकऱ्यांचा पिक विमा असेल शेतकऱ्यांच्या अनुदानाचा विषय असेल असे अनेक सर्वसामान्यांचे प्रश्न ऐकता कोणाचे तरी एक दोन कार्यकर्ते सोडता त्यांना बाकीचे सर्व सामान्य कधी दिसले नाहीत मग मतदानाच्या वेळी जीवाचीवाडीतील प्रत्येक मतदार का दिसतो आणि आमदाराला कोणत्या हाताने मतदान करायच हा सर्वसामान्य फरक पडलेला प्रश्न आहे येणाऱ्या काळात याची जाणीव नक्कीच मतदानाच्या रूपाने करून करून देतील असे मत ग्रामपंचायत सदस्य शिवाजी चौरे यांनी व्यक्त केले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे मतदार जनजागृती फेरी संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे करमाळा माढा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड, तहसीलदार शिल्पा ठोकडे, आणि गटशिक्षणाधिकारी जयवंत नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी काढण्यात आली. मुख्याध्यापक संतोष पोतदार यांच्या नेतृत्वात आयोजित या फेरीत पालक, विद्यार्थी, आणि शिक्षक अनुराधा शिंदे यांचे समवेत विविध घोषणांची देवाणघेवाण करण्यात आली. फेरी दरम्यान, उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी मतदान जागृती संदर्भात घोषणांची घोषणा केली. यामध्ये शिवाजी नाळे, हनुमंत येळे, अक्षय नाळे, अच्युत नाळे, योगेश नाळे, स्वप्नाली नाळे, ज्ञानेश्वरी नाळे, राधिका नाळे, आर्या नाळे, मोनिका नाळे, सृष्टी बंडगर, नवनाथ येळे, आणि अमर बागडी हे सर्व उपस्थित होते. या फेरीने मतदार जागृतीसाठी महत्वपूर्ण कार्य केले असून, सर्व नागरिकांनी मतदानाच्या प्रक्रियेत सक्रिय भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

## रिपाई एकतावादी जिल्ह्यातील सर्व जागा स्वबळावर लढणार– शैलेंद्र पोटभरे





**अंबाजोगाई । परवेज पटेल**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी राष्ट्रीय नेते नानासाहेब इंदिसे, यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर विधानसभा निवडणुका लढवल्या जात आहे. अंबाजोगाई येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीची बैठक कृष्णाई हॉटेल अंबाजोगाई येथे विधानसभेच्या अनुषंगाने महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या वेळी प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा अध्यक्ष तथा मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांच्या अध्यक्षस्थानी बैठक झाली. यावेळी बीड जिल्ह्यातील केज राखीव मतदार संघ व माजलगाव, परळी, गेवराई, बीड, विधानसभेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला यावेळी महिला मराठवाडयाच्या नेत्या कविताताई घोरपडे महिला जिल्हाध्यक्ष सीताताई भोसले डी.एस.तूपसमुद्रे जिल्हा उपाध्यक्ष बीड आबासाहेब जावळे ता.अध्यक्ष धारूर अक्षय कांबळे, ता. अध्यक्ष केज संतोष जावळे, तालुका युवा अध्यक्ष धारूर आदित्य जोगदंड, ता अध्यक्ष आनंद ओव्हाळ, ता. युवा केज अंबाजोगाई साहेबराव शिंदे,ता.अध्यक्ष परळी आशाताई मिसाळ,महिला अध्यक्ष बीड या बैठकीस व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजना आर्थिक टंचाईमुळे बंद:माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची साताऱ्यात टीका

**सातारा (वृत्तसंस्था)**



लाडकी बहीण योजना ही योजना फसवी होती. आर्थिक टंचाईमुळे ही योजना बंद करण्यात आली आहे आणि सत्ताधारी निवडणूक आयोगाने सांगितले म्हणून ही योजना बंद केल्याचे खोटे सांगत आहेत. ही वस्तुस्थिती जनतेला कळली पाहिजे, अशी कडवट टीका आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. येथील काँग्रेस भवन मध्ये चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेश जाधव आणि सरचिटणीस नरेश देसाई उपस्थित होते.चव्हाण पुढे म्हणाले, आज लाडकी बहीण योजनेचे पैसे बंद झाले आहेत. ही योजना मुळात धादांत खोटी आहे. ही योजना आर्थिक टंचाईमुळे म्हणजे तिजोरीत पैसे शिल्लक नसल्यामुळे बंद करण्यात आली आहे. मात्र आता राज्य सरकार निवडणूक आयोगाचे कारण देऊन ही योजना बंद झाल्याचे सांगत आहे. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना का फसवलं, याचे स्पष्टीकरण मुख्यमंत्र्यांनी द्यावे, अशी टीका चव्हाण यांनी केली. आज सायंकाळी महाविकास आघाडीची पहिली यादी जाहीर होत असून यामध्ये आम्हाला पुरेशा जागा मिळाल्या आहेत. जागा वाटपाचे निर्णय सुरू आहेत. दोन दिवसानंतर काँग्रेस उमेदवारांचे अर्ज भरले जाणार आहेत. त्याकरिता दोन निरीक्षक महाराष्ट्रात मुक्काम करून आहेत, असेही ते म्हणाले.कराड दक्षिण सह सातारा जिल्ह्यात कोणत्या जागेची मागणी केली, या प्रश्नावर पृथ्वीराज चव्हाण यांनी सूचक मौन बाळगले. ते पुढे म्हणाले, आजची लढाई विचारधारेची आहे. पैशाचा अतोनात वापर केला जात आहे. महाराष्ट्राच्या जनतेचा स्वाभिमान विकत घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र लोकांना आपलं हित कशात आहे हे चांगले कळते. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी अटीतटीची लढाई होणार आहे. काँग्रेस पक्ष जो वचननामा काढतो त्यानुसार तो कामे करतो. कर्नाटक व तेलंगणा राज्यात आम्ही जी वचने दिली होती, ती कामे करण्याचा विद्यमान सरकारचा प्रयत्न सुरू आहे.महाराष्ट्रात जर महाविकास आघाडीचे सरकार आले तर त्यांच्या मागे पुन्हा ईडीची चौकशी लावली जाईल, या प्रश्नावर चव्हाण म्हणाले, ईडी ही यंत्रणा भ्रष्टाचारी सत्तेसाठी वापरली जाते. मात्र सत्तेच्या बळावर केंद्र सरकार या यंत्रणेचा वापर करत आहे. अलीकडच्या काळात राजकीय मंडळींना हा कायदा वापरून तुरुंगात घालण्याचे उद्योग सुरू झाले आहेत. आम्ही फक्त पाहण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हतो. पण आता ईडीची सक्तीची कारवाई आम्ही चालू देणार नाही, असे ठामपणे त्यांनी सांगितले.

## ज्ञानसागर चा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**




शहरातील ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी मुलांनी विविध देशभक्तीपर गीते, कोळीगीते, शेतकरी आत्महत्या, बेटी बचाव, शिवराज्याभिषेक, सर्व धर्म समभाव, आई–वडिलांचे महत्त्व, पोवाडा गायन, नाटिका, नृत्याविष्कार सादर केले. या कार्यक्रमास परीक्षक म्हणून कांता दोडके व मोहन घोडके यांनी काम पाहिले. आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजय विद्यागर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मंदाकिनी आहिरे होत्या. अध्यक्षस्थानावरून आपले मनोगत व्यक्त करताना विजय वाघमारे म्हणाले की, विद्यार्थी जीवनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण जोपासण्याचे व वाढवण्याचे काम अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून केले जाते. अशा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कलेचा वारसा जपून स्वतःचे कौशल्य विकसित करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या कुलकर्णी व राजेंद्र चांदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल देशमुख, अमन शेख, संतोष बागलाने, संतोष बोराटे, रामदास काकडे यांनी परिश्रम घेतले. मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे केंद्र म्हणजे गुरुकुल शिक्षण पद्धती-इंगोले एस.ए.

### जिल्हा गुरुकुल असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील हॉटेल गंधर्व या ठिकाणी जिल्हा गुरुकुल असोसिएशन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बीड जिल्हा गुरुकुल संघटनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष म्हणून श्री इंगोले सर, सचिव तुपे सर तर कोषाध्यक्ष पदी वाघमारे सर यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच इतर गुरूकुलच्या संचालकांना सदस्यत्व बहाल करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष श्री इंगोले सर यांनी आपले विचार मांडताना म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे केंद्र म्हणजेच गुरुकुल पद्धती होय. या गुरुकुल शिक्षणपद्धती मध्ये विद्यार्थ्याला आदर्श जीवन जगण्याचे धडे मिळतात. हे धडे कुठेही मिळत नाहीत. या ठिकाणी विद्यार्थ्यांचे हित जोपासणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे. आपण आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तत्पर राहणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी चांगले शिक्षण मिळावे म्हणून आपले नशीब आजमावण्यासाठी शहराच्या ठिकाणी येतात आणि आपले स्वप्न उराशी बाळगून पुढे वाटचाल करीत असतात. गुरुकुल मधील प्रत्येक विद्यार्थी जीवनात यशस्वी कसा होईल यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. तसेच इतर संचालकांनी विद्यार्थ्यांच्या हिताचे, त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने मत या वेळी स्पष्ट केले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष तथा संस्कार दीप गुरुकुल चे संचालक इंगोले सर, समृद्धी गुरुकुलचे तुपे सर, आनंदी गुरुकुलचे वाघमारे सर, सरस्वती गुरुकुलचे घुगे सर, लक्ष्य गुरुकुलचे खंदारे सर, स्वप्नपूर्ती गुरुकुलचे देवडकर सर, काकडे सर, परिवर्तन गुरूकुलचे तिडके सर, ज्ञानप्रकाश गुरुकुलचे राख सर, जीवन शिक्षण गुरुकुलचे इंगोले सर, जय भवानी गुरुकुलचे मोरे सर, सेवाश्री गुरुकुलचे पवार सर, स्वामी विवेकानंदचे जाधव सर, विद्याधन गुरुकूलचे डोंगरे सर, ज्ञानेश्वरी गूरुकुलचे वारे सर, अजिंक्य गुरुकुलचे केकान सर, गुरुकृपा गुरूकूलचे सपकाळ सर, प्रगती गुरुकुलचे मायकर सर, गुरुकुलचे जेधे सर इ. संचालक या वेळी उपस्थित होते

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077